महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर, बोईसर, रोड,
कोळगांव (प.) जिल्हा – पालघर. दुरध्वनी – ०२५२५-२५११००
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.पोअपा/आस्था-१/तात्पुरती/सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द/पोह, पोना/ ४६७ /२०२२ दिनांक :- १३ /१०/२०२२

विषय :- पोलीस नाईक व पोलीस हवालदार या संवर्गातील पदोन्नती करीता तात्पुरती सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

---ooo---

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस हवालदार व पोलीस नाईक यांची पदोन्नती करीता सन-२०२२ ची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी www. palgharpolice. gov. in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदर सेवाजेष्ठता यादी सर्व विभागीय पोलीस उप अधिकारी/प्रभारी अधिकारी पो. स्टे./ शाखा/पोलीस मुख्यालय पालघर यांना त्यांच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यांत आली आहे. सदरचे पत्र दररोज सर्व पोलीस अंमलदारांना हजेरीवर वाचुन दाखवावे. तसेच जे पोलीस अंमलदार दिर्घ रजेवर/गैरहजर आहेत त्यांना प्रसिध्द करण्यांत आलेल्या यादीचे अवलोकन करणेबाबत समज पत्र देवुन त्यांची नोंद आपले आस्थापनेवर ठेवावी व एक प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच यादीतील अंमलदारांचे स्थान निश्चितीबाबत सर्व पोलीस अंमलदाराच्या निदर्शनास आणवे. सेवाजेष्ठता यादया वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन पोलीस स्टेशनच्या नोटीस बोर्डावर लावुन सर्व अंमलदारांच्या निदर्शनास आणुन दयावे.

सर्व पोलीस अंमलदार यांनी सदर सेवाजेष्ठता सुचीमध्ये नमूद केलेली त्यांची जन्म तारीख/भरती तारीख/जात/प्रवर्ग/पदोन्नतीच्या तारखा बरोबर आहेत अगर कसे तसेच त्यामध्ये काही उणीवा/चुका असल्यास अगर स्थान निश्चितीबाबत अडचण असेल व त्याबाबतचे आक्षेप लेखी स्वरुपात तात्काळ संबधीत प्रभारी अधिकारी यांचेकडे सादर करुन, संबधीत अंमलदार यांचे आक्षेप योग्य आहे अगर कसे? याबाबत आपले अभिप्रायासह सदर आक्षेप अर्ज दि.१६/१०/२०२२ पावेतो इकडील कार्यालयास सादर करावेत.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक पीएमएन ०३१४/२०३/प्र. क्र. ६८/पोल-५ ब, दि.१०/१२/२०१८ अन्वये राज्य राखीव पोलीस बलातुन जिल्हा पोलीस दलात /इतर घटकात विनंतीवरुन बदलुन जाणा-या अंमलदारांची सेवाजेष्ठता निश्चित करताना संबधीत राज्य राखीव पोलीस दलाच्या अंमलदारांचे भरती वर्षे प्रमाण मानले जाईल व राज्य राखीव बलातील बदलुन जाणारा अंमलदार ज्या वर्षी राज्य राखीव पोलीस दलात भरती झाला असेल त्या वर्षातील जिल्हा पोलीस दलात भरती झालेल्या सर्व अंमलदारांच्या सर्वात शेवटी त्याला सेवाजेष्ठता दिली जाईल. व त्या वर्षात त्याच्या प्रवर्गातील अंमलदार ज्या पदावर कार्यरत आहेत. त्या पदावरच तो नियुक्तीस पात्र राहिल असे निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं. बीसीसी २०१८/ प्र. क्र. ३६६ /१६ -ब, दि. ०७/०५/२०२१ अन्वये मा. उच्च न्यायालय मुंबई यांना यांचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि. ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयातील तरतुदीमधील आरक्षणाचा लाभ घेवुन सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत असे अधिकारी/कर्मचारी (अ) दि. २५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

(ब) दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवा प्रवेशाच्या मुळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे नेमणुकीतील पोलीस नाईक पोलीस हवालदार यांचे नांव सेवाजेष्ठता यादीत असल्याबाबत खात्री करुन त्यांबातचे प्रमाणपत्र दि. १६/१०/२०२२ रोजी न चुकता इकडील कार्यालयात हस्ते सादर करावे. तसेच ज्या पोलीस अंमलदारांचे नांव सेवाजेष्ठता यादी समाविष्ठ नाही. अशा अंमलदारांचे नांवे तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावीत.

सेवाजेष्ठता यादीत प्रसिध्द केलेल्या अंमलदारांपैकी एखादा अंमलदार आंतरजिल्हा बदली/सेवेतुन कमी/वडतर्फ/सक्तीने सेवानिवृत्त/मयत झाले असल्यास त्याबाबत माहिती संबधीत प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयात उलट टपाली सादर करावी. त्यानंतर सदर माहितीचे आधारे सदर सेवाजेष्ठता यादीत अदयावत करुन संबधीत पोलीस अंमलदारांची सेवाजेष्ठता यादीतील स्थान निश्चित करण्यांत येईल. **तसेच सेवाजेष्ठता यादीतील जे पोलीस अंमलदार मागासवर्गीय आहेत.त्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र न चुकता सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दि. २८/०५/२०१८ अन्वये संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान असलेले संगणक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याने ज्या अंलदारांने संगणक प्रमाणपत्र सादर केले नसल्यास त्यांनी त्यांचे संगणक प्रमाणपत्र सादर करावेत. सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील पदोन्नतीसाठी विचार करण्यांत येणार नाही. यांची सर्व संबधीत पोलीस अंमलदार यांनी नोंद घ्यावी.** तसचे दि.१६/१०/२०२२ रोजीनंतर प्राप्त झालेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

सदर सेवाजेष्ठता यादी तात्पुरती स्वरुपाची असुन, संबधीत पोलीस अंमलदार यांच्याकडुन प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार सदर यादीत आवश्यक दुरुस्ती करुन, त्याबाबत सुधारीत सेवाजेष्ठता यादी www. palgharpolice. gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल.

(बाळासाहेब पाटील )
पोलीस अधीक्षक, पालघर

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा पालघर
सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/ शाखा, जिल्हा पालघर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय पालघर

प्रत योग्य त्या कार्यवाही करीता

प्रभारी अधिकारी, सायबर सेल पालघर

२/- सदर सेवाजेष्ठता यादया सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी/प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी/रापोनि, पोलीस मुख्यालय पालघर तसेच सर्व पोलीस अंमलदारांचे ई-मेल आयडीवर प्रसिध्द करण्यांत यावी.